अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in

दिनांक :– ३०/०८/२०२४

**–: प्रेसनोट :–**

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | बृहन्मुंबई विभाग. |
| गुन्हा नोंद क्रमांक | २४/२०२४. |
| कलम | कलम ७ भ.प्र. अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | श्री.रविंद्रनाथ शिवपुजन सिंह, ५६वर्ष, प्रशासकीय अधिकारी, हिंदी विद्याप्रचार समिती, घाटकोपर(प), मुंबई व कनिष्ठ लिपीक, हिंदी हायस्कूल, घाटकोपर(प), मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रू. १,५०,०००/- तडजोडीअंती रू. ५०,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रू. ५०,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी त्यांचे मुलीचे ११ वी कॉमर्स शाखेचे ॲडमिशन करीता ऑनलाईन फॉर्म भरला होता. नमूद फॉर्म मध्ये त्यांनी रामनिरंजन झुनझुनवाला कॉलेज, घाटकोपर(प), मुंबई व इतर ०६ कॉलेजची नावे दिलेली होती. नमूद कॉलेजच्या ॲडमिशनची दोनवेळा यादी प्रसिध्द होवूनदेखील नमूद यादीत तक्रारदार यांचे मुलीचे नाव लागले नाही. म्हणून तक्रारदार यांनी नमूद कॉलेजचे प्रशासकीय अधिकारी श्री. रविंद्रनाथ सिंह यांची भेट घेतली असता, त्यांनी अजून एक यादी प्रसिध्द होण्याची वाट बघा असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी मुलीचे ॲडमिशनकरीता श्री. राजहंस धनजंय सिंह, विधानपरिषद आमदार, मुंबई यांचे शिफारस पत्र घेवून दिनांक २६/०८/२०२४ रोजी पुन्हा रविंद्र सिंह यांची भेट घेतली असता, रविंद्र सिंह यांनी तक्रारदार यांचे मुलीचे ॲडमिशन करीता तक्रारदार यांचेकडे रू. १,५०,०००/- लाचेची मागणी केली. तक्रारदार यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २८/०८/२०२४ रोजी ला.प्र.वि. मुंबई येथे समक्ष हजर राहुन लोकसेवकाविरूध्द तक्रार दिली.<br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २९/०८/२०२४ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्या मुलीच्या ॲडमिशनकरीता तक्रारदार यांच्याकडे रू. ५०,०००/- लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार तात्काळ करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांना लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले, म्हणून श्री. रविंद्रनाथ शिवपुजन सिंह, प्रशासकीय अधिकारी, हिंदी विद्याप्रचार समिती, घाटकोपर(प), मुंबई व कनिष्ठ लिपीक, हिंदी हायस्कूल, घाटकोपर(प), मुंबई यांच्याविरूध्द ला.प्र.वि. मुंबई येथे भ्र.प्र. अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अथवा लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.
संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.

**टोलफ्री क्र.** १०६४, दुरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८

**वेबसाईट** :– acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :– acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :– addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :– www.facebook.com - Maharashtra ACB
**मोबाईल ॲप** :– www.acbmaharashtra.net